


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ००२ वा | सोमवार | दि. २७ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# तत्कालीन डॉ. तडसने गाठला भ्रष्टाचाराचा कळस!

## जिल्हा सामान्य रुग्णालयात बेफाम भ्रष्टाचार !

## केंद्रीय राज्य आयुष मंत्री प्रतापराव जाधव देखील मूळ चूप !

**बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालय करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणात तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन विठ्ठल तडस हल्ली मुक्काम हिंगोली व नेहमी चर्चेत असलेले वादग्रस्त भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम अकोला व एन.एल.हेल्थ केअर कम्पनी सोलापूर येथील कंत्राटदार सह इतर यांच्यावर विभागीय चौकशीत भ्रष्टचाराचे आरोप सिद्ध होऊनही आरोग्य प्रशासन कारवाईस टाळाटाळ का करत आहे. भ्रष्टचारी प्रकाश नामदेव बोथे यांना बडतर्फची कारवाई तर झाली परंतु भ्रष्टयाचारातून कमावलेली चल - अचल संपत्ती त्वरित सील करून त्याचे लिलाव करून आलेला पैसा शासन तिजोरीत जमा करण्यात यावा व संबंधित एन एल हेल्थ केअर कम्पनी सोलापूर कंत्राटदार यांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकून त्यांच्यावर कडक कारवाईस अर्थपूर्ण टाळाटाळ करण्यात येत असल्याची तक्रार आरोग्य विभाग व एलसीबी प्रमुख यांच्याकडे तक्रारकर्त्यांनी केली असून या पूर्ण भ्रष्टचाराचा उलगडा आम्ही पुढील प्रत्येक सत्रात प्रकाशित प्रसारीत करणार आहोच**




**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा सामान्य रुग्णालयातील करोडो रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी विभागीय चौकशी समितीच्या अहवालात दोष सिद्ध झाले असून बहुचर्चित भांडारपाल प्रकाश नामनदेव बोथे यास उपसंचालक अकोला डॉ. कमलेश भंडारी यांनी निलंबित प्रकाश बोथे यांना बडतर्फ केले आहे. परंतु कोव्हिडं १९ काळात तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस हे कार्यरत होते. त्याच काळात रुग्णांणच्या उपचारासाठी शासनाने करोडो रुपये त्वरित मंजुरात करून मॉड्युलर ओटी तय्यार करून रुग्णाणा सेवा मिळावी ती करोडो रुपये खर्च करून सोलापूर येथील हेल्थ केअर कंपनीला देण्यात आली ती आज पर्यंत कार्यन्वित झालेली नाही .जिल्हाशल्य चिकित्सक नितीन तडस यांच्या कार्यकाळापासून जिल्हाशल्य चिकित्सक डॉ सुभाष चव्हाण यांच्या काळापर्यंत सोलापूर येथील हेल्थ केअर कंत्राटांतदार यास पूर्ण रक्कम नियमबाह्य अदा केली. मॉड्युलर ओटीची निविदा सह दिलेल्या वेळेत तय्यार झाली असती तर जवळपास शेकडो रुग्णाणचे जीव वाचले असते या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यानी भ्रष्टाचार लापरवाही केली त्या सर्व दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होणे गरजेचे असून केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव देखील मूळ चूप का आहेत? हा ही प्रश्न उभा आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयातील तत्कालीन डॉ. नितीन विठ्ठल तडस, जिल्हा शल्यचिकीत्सक, सामान्य रुग्णालय, बुलढाणा यांचे तयार करण्यात आलेल्या दोषारोपातील बाबींचे तपशिलवार विवरणपत्र हाती आले आहे. डॉ. नितीन विठ्ठल तडस, तत्कालीन जिल्हा शल्यचिकीत्सक, सामान्य रुग्णालय, बुलढाणा यांचेकडे १५ ऑक्टोंबर २०२० ते ३१ मे २०२१ या कालावधीमध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील जिल्हा शल्यचिकित्सक या पदाचा कार्यभार असतांना कार्यालयीन रोखवहीमध्ये दैनंदिन जमा खर्चाचे नोंदी घेवुन महिन्याअखेर त्याचा गोषवारा नोंदवुन त्यावर आहरण व संवितरण अधिकारी यांनी स्वाक्षरी केली किंवा नाही यांची पडताळणी करण्याची जबाबदारी कार्यालय म्हणुन डॉ. नितीन विठ्ठल तडस यांची होती. तसेच बँक पासबुक व रोख नोंदवही यामध्ये ताळमेळ पडताळून पाहणे,त्यामध्ये काही तफावत होता कामा नये, तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांचे खात्यामध्ये शिल्लक राहता कामा नये, याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुख म्हणुन श्री. नितीन तडस यांची होती.प्रमुख तसेच मोडयुलर ओटी व लेबर रूम एकुण निविदा रक्कम १२,११,३०,००० चे कार्यादेश निर्गमित करतांना विहीत शासन निर्णयान्वये ३ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही! तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार सदरचे काम १६० दिवसामध्ये करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही संबंधीत वादग्रस्त पुरवठादाराकडुन करण्यात आलेली नसल्याचे दिसुन येते. तसेच सदरील कामाचे पुरवठापुर्व तपासणी पीडीआय वा त्रयस्थ संस्थेमार्फत परिक्षण केले नाही व संबंधीत संस्थेनी मोडयुलर ओटी कार्यान्वित न करता केवळ साहित्याचा अर्धवट पुरवठा केल्यावर देयकाचे ८० टक्के रक्कम अदा करणे व्यवहारीकदृष्ट्या योग्य नाही, तसेच संबंधीत वादग्रस्त सोलापूरच्या हेल्थ केअर कंपनीचा इनामदार यांच्या संस्थेला पुरवठा आदेश देण्यापूर्वी मा.जिल्हाधिकारी, बुलढाणा यांची मंजुरी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही डॉ. नितीन तडस यांनी केली नसल्याने कर्तव्य परायणतेत कसुर करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चे उल्लंघन केले आहे. शिवाय डॉ. नितीन विठ्ठल तडस, तत्कालीन जिल्हा शल्यचिकीत्सक, सामान्य रुग्णालय, बुलढाणा यांचेकडे दिनांक १५ ऑक्टोबर २०२० ते ३१ मे २०२१ या कालावधीमध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय,बुलढाणा येथील जिल्हा शल्यचिकीत्सक या पदाचा कार्यभार होता. जिल्हा सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील भ्रष्टाचाराबाबत विपरीत बातमी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. त्यामुळे शासनाची प्रतिमा मलीन झाली असल्याने नियंत्रण अधिकारी म्हणून डॉ. नितीन विठ्ठल तडस, तत्कालीन जिल्हा शल्यचिकीत्सक यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चे उल्लंघन केले आहे.

अजून बरेच काही पुढील भागात..

## बोलेरो अपघात; १६ जखमी ३ गंभीर जखमी !

**जनसंचलन/ लोणार**

शेगाव - पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर लोणार शहराजवळील हॉटेल हर्षाजवळ हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील गौढाळा गावातील भाविकांच्या बोलेरो पिकअप गाडीला अपघ-ात झाल्याने अनेकजण यात गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. लोणार तालुक्यातील किनगाव जटटू येथील दर्गावर नवस फेडण्यासाठी सदर भाविक जात होते बोलोरो पिकअप मालवाहू गाडी क्रमांक एम. एच. ४८. ए. वाय. ६०११ ने जात असतांना गाडीचा अचानक जॉईट तुटल्याने भरधाव पिकअप गाडी पलटी होऊन गाडीतील १६ भाविक जखमी झाले. तसेच ३ भाविकांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांना प्राथमिक उपचार करून बुलढाणा येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. यामध्ये संभाजी दशरथ कांबळे वय ४० वर्ष, लक्ष्मण निधान भिसे वय ५२ वर्ष, भीमराव सदाशिव घारे वय ६० वर्ष, अनुसया साहेबराव पाईकराव वय ६० वर्ष, शंतनू दिपक उबाळे वय १४ वर्ष, संदीप शांताराम उबाळे वय ३९ वर्ष, प्रणाली संदीप उबाळे वय १८ वर्ष, सुनिल सपन पहेबहादूर वय ३८ वर्ष, राजकुमार जीजेबा उबाळे वय ५० वर्ष, भीमराव सदाशिव लाटे वय ४५ वर्ष, विनोद बाबुराव उबाळे वय ३५ वर्ष, केशव कुंडलिक गायकवाड वय ३५ वर्ष, भारती भास्कर कांबळे वय ५० वर्ष, दिपक तुकाराम उबाळे वय ४० वर्ष, सोहम दिपक उबाळे वय १३ वर्ष, प्रणव संदीप उबाळे वय १७ वर्ष हे सर्व भाविक हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश इंगोले, बीट जमादार संतोष चव्हाण, अनिल शिंदे, गणेश निकस, वाहतूक शाखेचे पंढरीनाथ गीते. मनोजकुमार शेजूळ, राहुल कायंदे यांनी धाव घेत मदत केली

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मातृतीर्थ जिल्ह्याला विकासाची प्रतीक्षा करावी लागणार नाही-ना.मकरंद पाटील

जनसंचलन/ सिंदखेडराजा

जिल्ह्याला विकासाची फार प्रतीक्षा करावी लागणार नाही. सर्वकष आणि सर्वसमावेशक विकासाला आपले प्राधान्य असेल, असे प्रतिपादन जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री तथा राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी येथे केले. शनिवारी त्यांनी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे दर्शन घेऊन सिंदखेडराजासह जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची ग्वाही दिली. राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांनी वंदन केले. त्यानंतर राजवाडा परिसरात महायुतीच्या वतीने आयोजित स्वागत कार्यक्रमात त्यांनी जिल्ह्याचे प्रश्न, समस्या, भौगोलिक परिस्थिती, येथील महत्त्वाची ठिकाणे यांचा अभ्यास करून या पुढील काळात सर्वकष विकासाचा मार्ग अधिक प्रशस्त केला जाईल, असे सांगितले. यावेळी आमदार मनोज कायंदे, माजी खासदार सुखदेव काळे, माजी आमदार तोताराम कायंदे, पालकमंत्री यांचे सहकारी नितीन भारगुडे-पाटील, राजेंद्र राजपुरे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे, विष्णू मेहेत्रे व अन्य उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री म्हणाले की, माँसाहेब जिजाऊ यांनी छत्रपती शिवराय यांच्यासारखा राजा घडविला. त्यांच्या जन्मस्थळी वंदन करूनच जिल्ह्याच्या कारभाराला आपण सुरुवात करत असल्याची भावना व्यक्त केली. भक्ती आणि शक्तीचा संगम असलेल्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व आपल्याला करण्याची संधी मिळाली असल्याचे ते म्हणाले. सोबतच ज्या वाई मतदारसंघाचे प्रतिनिधित्व आपण करतो त्या वाईमधील महाबळेश्वर भागात क्षेत्र महाबळेश्वर येथे जिजाऊ माँसाहेब यांची ३६० वर्षापूर्वी सुवर्ण तुला झाली होती. माँसाहेब यांची सुवर्ण तुला झालेले ठिकाण आपल्याच मतदासंघात असल्याचा अभिमान आहे, असे ते म्हणाले.

# अत्याधुनिक रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेत

जनसंचलन/मेहकर



शिंदेसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने देण्यात आलेल्या रुग्णवाहिकेचे आधुनिकीकरण करून तिचे लोकार्पण केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. २२ जानेवारी मेहकर येथे लोकार्पण कार्यक्रम पार पडला. माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नांतून ही रुग्णवाहिका अत्याधुनिक वैद्यकीय साधनांनी सुसज्ज करण्यात आली आहे. लोणार-मेहकर तालुक्यातील गरजू रुग्णांच्या सेवेसाठी १८ लाख रुपये खर्चुन रायमुलकर यांनी रुग्णवाहिकेला अत्याधुनिक स्वरूप दिले. लोकार्पण सोहळ्याला शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी, सुरेश वाळुकर, रामराव म्हस्के, वैशाली सावजी, यमुना फंगाळ, कालिंदा फंगाळ, रेखा बिबे, विलास मोहरुत, सुदर्शन मगर, डॉ. काशिनाथ घुगे, अरुण दळवी, दिलीप देशमुख, मंगेश गायकवाड यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते

# हजारो वर्षे जुनी माझी मराठी भाषा !!!!

**हृदयस्थ उत्कट भावभावना या मातृभाषेतूनच प्रकट होत असतात. पूर्वीच्या लोकांनी, थोर विचारवंतांनी आपल्या मराठी भाषेला काव्य व ग्रंथाच्या माध्यमातून अलंकृत केले. तिचे अस्तित्व कायम रहावे म्हणून अनेक जाच सोसले. आता मात्र नव्या पिढीला ती गावंढळ भाषा वाटून अन्य भाषेचा सर्रास वापर करतात. माझी मराठी किती समृद्ध आहे? यावर श्री.एन. कृष्णकुमार से.नि. प्रा.शिक्षक यांचा विशेष लेख...**

## संपादकीय लेख

मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. ती भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. महाराष्ट्र राज्याची ती अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. सन २०११च्या जनगणनेनुसार भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे ९ कोटी आहे. मातृभाषा मराठी असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार ती जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे ती आधुनिक रूप आहे. गाथा सप्तशती हा मराठीतील २२२० वर्ष जुना पहिला ग्रंथ होय. तीचे वय किमान २५०० वर्षे इतके आहे. माझ्या या मराठी भाषेचा गौरव संतशिरोमणी ज्ञानेश्वरजींनी त्यांच्या साहित्यातूनही केलेला दिसून येतो. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून तिला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आजतागायत या भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे. मराठी शिलालेख: राजा केसिदेवरायाच्या कारकिर्दीत कोरलेला अक्षी शिलालेख हा आजवर सापडलेला मराठी भाषेतील पुराणतम शिलालेख आहे. अक्षी शिलालेखाच्या शोधापूर्वी कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या उंच मूर्तीच्या पायाशी मराठीत कोरलेला लेख- चामुण्डराजे करवियले, हा आद्य मराठी लेख समजला जात असे. अक्षी हे गाव महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील अलिबागपासून दक्षिणेस ५ किमी अंतरावर अलिबाग- मुरुड जंजिरा मार्गावर आहे. त्याचा उल्लेख इ.स.१८८३च्या कुलाबा गॅझेटियरमध्ये नोंद आहे. त्यावरील मजकूर- गी सुष संतु। स्वस्ति ओं। पसीमस-मुद्रधीपती। श्री कोंकणा चक्रीवर्ती। स्री केसीदेवराय। महाप्रधान भइर्जु सेणुई। तसीमीनी काले प्रव्रतमने। सकु संवतु:। ९३४ प्रधावी संवसरे: अधिकु। दिवे सुक्रे बोलु। भइर्जुवे तथा बोडणा तथा नौ।कुंवली अधोर्यु प्रधानु। महलषुमीची वआण। लुनया कचली ज।ह्वङ्ग हा राजा केसिदेवरायाचा अक्षी शिलालेख इ.स.१०१२ सालचा आहे. हा एका ओबडधोबड शिळेवर कोरला असून त्या शिळेच्या माथ्यावर चंद्रसूर्य, मजकुराखाली गद्धेगाळ व शेवटी पुन्हा चंद्रसूर्य असे कोरीवकामाचे स्वरूप आहे. तो देवनागरी लिपीत असून भाषा संस्कृत-मराठी मिश्र आहे. इंग्रजी कालगणनेनुसार या लेखाची तारीख १६ मे १०१२ अशी आहे. (अर्थ- जगी सुख नांदो. ओम पश्चिम समुद्राधीपती श्री कोकण चक्रीवर्ती श्री केसिदेवराय यांचा महाप्रधान भइजु सेणुइ याने शक संवत ९३४ परिधावी संवत्सर अधिक मासात शुक्रवारी वद्यपक्षात देवीचा बोढणासाठी नऊ कुंवली धान्य दान केले. येथे लुनया- लेख कोरणाराचे नाव.) कुडल संगम, ता.दक्षिण सोलापूर येथील मराठी शिलालेख- वाछि तो विजेया होईवा।। कुडल शब्द कन्नड असून त्याचा अर्थ संगम आहे. भीमा व सीना या दोन नद्यांचा संगमावर वसलेल्या या गावात चालुक्यकालीन संगमेश्वर मंदिर आहे. त्याची स्थिती बऱ्यापैकी असून तेथील सभामंडपातील तुळईवर अडीच ओळींचा लेख कोरलेला आहे. त्याचा काही भाग संस्कृत काही भाग मराठी आहे. शेवटचे वाक्य वाछि तो विजेया होईवा।। असे मराठीत आहे. त्यात काळाचा स्पष्ट उल्लेख आहे. तेथे शके ९४० असे कोरले आहे. साधारणतः इ.स.१०१८ या काळात तो कोरला गेला असावा. श्रवणबेळगोळच्यानंतर दिवे आगार ताम्रपटाचा शोध लागला. त्याचा काळ शके ९८२ इ.स.१०६० होता. त्यानंतर कुडलच्या शिलालेखाचा शोध लागला.

मराठी भाषेचा इतिहास: माझ्या या भाषेचा उदय संस्कृतच्या प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेचा महाराष्ट्री या बोलीभाषेपासून झाला, असे बहुतांशी मानले जाते. पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. ही भाषा देवनागरी लिपी वापरून लिहिली जाते. इ.स.१२७८मध्ये संत म्हाइंभट यांनी लीळाचरित्र लिहिले. त्यानंतर इ.स.१२९०मध्ये पवित्र ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना संत ज्ञानेश्वरजींनी केली. महानुभाव संप्रदायाने हिच्या साहित्यात मौलिक भर घातली. संत एकनाथाजींनी या भाषेत भारुडे लिहिली आणि पवित्र एकनाथी भागवत, पवित्र भावार्थ रामायण आदि ग्रंथांची भर घातली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुर्हतमेढ रोवली व पेशव्यांनी या साम्राज्याचा विस्तार खुंटविला. त्यानंतर माझ्या या भाषेस राजाश्रय मिळाला. इ.स.१९४७नंतर स्वतंत्र भारत देशाने तिला अधिकृत राज्यभाषेचा दर्जा दिला. इ.स.१९६०मध्ये मराठी भाषिकांच्या एकसंध महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि तिला राजभाषेचा मुकूट प्राप्त झाला. इतका जुना व वैभवशाली इतिहास प्राप्त आपली मराठी भाषा असतानाही अतिशिकलेले लोक आपल्या शिक्षणाचा पगडा पाडावा म्हणून अन्य भाषेत बोलतात. नागपूर, मुंबई यासारख्या शहरात मराठीचे अक्षरशः धिंडवडे निघाले आहेत. तेथीलच राहणारे, मातृभूमीही तीच, प्राथमिक शिक्षणही येथेच झालेले, वार्तालाप करणारेही याच मातीतील. मात्र मराठीलाच परकीय वागणूक दिली जात आहे. येथील मराठी अस्मिता धुळीस मिळून ती आई-वडिलांना लाथाडणारी लाजमोडी झाली आहे, याचीच खंत वाटते. माझी मराठी आता अभिजात भाषा झाली, याचा मला सार्थ अभिमान वाटतो

लेखक
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी...

# मद्यविक्रेत्यावर एमपीडीएची कारवाई

जनसंचलन/बुलढाणा

शहरातील आंबेडकर नगरमध्ये राहणाऱ्या संजय श्यामराव पवार याच्या विरोधात एमपीडीएअंतर्गत कारवाई करण्यात आली असून, २५ जानेवारी रोजी त्याची रवानगी बुलढाणा कारागृहात करण्यात आली आहे. मद्यविक्रीचा अवैधरित्या व्यवसाय करत होता. त्याच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात सात गुन्हे दाखल असून, त्याच्यावर पाच वेळा प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. त्याला आता ११ महिन्यांसाठी न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी दादा प्रतिबंध कायद्यांतर्गत ही कारवाई झाली.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# आदिवासी बांधवांना मदत करण्यास आगामी काळात प्राधान्य दिले जाईल : पालकमंत्री ना. मकरंद पाटील

बुलढाणा जिल्ह्याच्या पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राचा विकास जलदगतीने होत आहे. शेगाव विकास आराखड्यातील सर्व कामे पूर्ण झाली आहेत. लोणार सरोवर विकास आराखड्याची अंमलबजावणी सुरु असून सिंदखेडराजा विकास आराखड्यासाठी २३३ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच ज्ञानगंगा, अंबाबर्वा अभयारण्य, मियावाकी, इकोटुरीझम, ॲग्री टुरीझमला देखील प्रोत्साहन दिले जात आहे. या उपक्रमातून जिल्ह्यात पर्यटन विकास आणि रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होणार आहे. यासह जंगल संसाधने आणि वन्य परिसरात राहणाऱ्या ग्रामस्थांचा प्राधान्याने विचार करुन या भागातील आदिवासी बांधवांना मदत करण्यास आगामी काळात प्राधान्य दिले जाईल.

शहरी व ग्रामीण भागातील वंचित व गरजू लोकांना हक्काचे घर मिळावे यासाठी जिल्ह्यात शबरी आवास, रमाई आवास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर धनगर आवास, मोदी आवास, प्रधानमंत्री आवास इत्यादी विविध आवास योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात चालू वर्षात एकूण १७ हजार ५५ घरकुलांकरीता २६७ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत जिल्ह्यातील सुमारे साडेसहा लाख महिलांना दरमहा पंधराशे रुपयांची मदत देण्यात आली आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधताना सामाजिक स्तरही उंचावण्यासाठी समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, निवासी शाळा, आश्रमशाळा, स्वाधार योजना, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना, मुलींच्या विवाहासाठी कन्यादान योजना इत्यादी विविध योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे. यामुळे समाजातील मागे पडलेल्या वंचित घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामिल करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. या संविधानामुळे राष्ट्र निर्माणासाठी हातभार लागला आहे. प्रत्येक नागरिकाने सकारात्मक विचारातून प्रगतीकडे वाटचाल करण्याचा संकल्प करावा. येत्या काळात आपण सर्व जण चिकाटीने



देशाला प्रगतीपथावर नेऊ, असे आवाहन पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी यावेळी केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या अधिकारी, कर्मचारी व खेळाडूंना पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या हस्ते मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी ध्वजदिन निधी संकलन २०२३ चे बुलढाणा जिल्ह्याचे १०४ टक्के उदिष्ट पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉ. लिडर रुपाली सरोदे यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे उत्कृष्ठ महसूल अधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, तहसिलदार निलेश मडके, नायब तहसिलदार प्रविण घोटकर यांच्यासह आपत्ती व्यवस्थापन विभाग, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, निवडणूक विभाग, जिल्हा क्रीडा कार्यालयातील खेळाडू, समाजकल्याण कार्यालय, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला. तसेच शेगाव तालुक्यातील ११ गावामध्ये केस गळती प्रकरणी प्रशासनाला केलेल्या सहकार्याबाबत बोंडगावचे माजी सरपंच रामेश्वर थारकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच ॲलीमको व जिल्हा प्रशासनामार्फत दिव्यांगाना विनामुल्य व्हिल चेअर, रोलेटर, एलबो क्रंच आणि टायसिकल व बॅटरी मोटर सायकलचे वाटप करण्यात आले.



ॲग्रीस्टॅक उपक्रमातंर्गत फार्मर आयडी प्राप्त केलेल्या शेतकऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य समारंभात पोलीस विभागाने शानदार पथसंचलन केले. त्यानंतर शालेय विद्यार्थ्यांव्दारे बॅण्ड ड्रिल, डंबेल्स कवायत, डिश कवायत, ॲरोबिक्स डान्स व कराटे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यावेळी प्रेक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणाला दाद दिली. कार्यक्रमाचे संचालन चंद्रशेखर जोशी व श्री. मोरे यांनी केले



# महाकुंभ मेळ्यातली मोनालिसा होणार मालामाल, या दिग्दर्शकाकडून सिनेमा ऑफर

**मुंबई :** फूटपाथवर रुद्राक्षाच्या माळा विकणाऱ्या मोनालिसाचे महाकुंभ मेळ्यात नशीब चमकले असून तिला चित्रपटांमध्ये काम करण्याची ऑफर मिळाली आहे. चित्रपट निर्माते सनोज मिश्रा यांनी तिला त्यांच्या आगामी द डायरी ऑफ मणिपूर या चित्रपटात मुख्य अभिनेत्री म्हणून काम करण्याची ऑफर दिली आहे. मोनालिसा आणि तिच्या कुटुंबाने हा चित्रपट करण्यास होकारही दिला आहे. या चित्रपटात मोनालिसा एका निवृत्त लष्करी अधिकाऱ्याच्या मुलीची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटाचे शूटिंग एप्रिल ते जून या कालावधीत ईशान्य भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी केले जाईल. हा चित्रपट ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. शूटिंगपूर्वी मोनालिसा घेणार अभिनयाचे प्रशिक्षण शूटिंगपूर्वी मोनालिसाला मुंबईत तीन महिने अभिनयाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. महाकुंभात चाहत्यांकडून सतत होणाऱ्या त्रासामुळे मोनालिसा आणि तिचे वडील मध्य प्रदेशातील महेश्वर येथील त्यांच्या घरी गेले आहेत. चित्रपट दिग्दर्शक सनोज मिश्रा आणि त्यांची टीम दोन दिवसांनी महेश्वरला पोहोचतील आणि मोनालिसा आणि तिच्या कुटुंबाला भेटतील व ते तिथेच त्यांच्यासोबत महेश्वरमध्ये सिनेमासाठी कॉण्ट्रॅक्ट साइन केले जाणार असल्याचे म्हटले जात आहे.

दिग्दर्शक मोनालिसा पर्यंत कसे पोहोचले? टीव्ही दाखवल्या जाणाऱ्या मोनालिसाची मुलाखत पाहिल्यानंतर, दिग्दर्शक सनोज मिश्रा तिच्या शोधात प्रयागराज महाकुंभात आले होते. येथे ते तिच्या कुटुंबातील सदस्यांना भेटले. कुटुंबातील सदस्यांनी सनोज मिश्रा यांचे मोनालिसा आणि तिच्या वडिलांशी त्यांच्या मोबाईलवर संभाषण करुन दिले.

**चित्रपटाच्या ऑफरमुळे मोनालिसा खूश**

सनोज मिश्रा यांच्या मते, मोनालिसा आणि तिचे कुटुंब चित्रपटात काम करण्याची ऑफर ऐकून खूप आनंदी आणि उत्साहित आहेत. दिग्दर्शकाच्या मते या चित्रपटात काम मिळाल्यानंतर मोनालिसाच्या कुटुंबाची गरिबी संपेल आणि त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. मोनालिसाची आजी म्हणते की तिच्या नातीची खूप दिवसांपासूनची इच्छा चित्रपटांमध्ये काम करण्याची इच्छा या निमित्ताने पूर्ण होणार आहे.

सनोज मिश्रा म्हणाले, व्हायरल व्हिडिओंमध्ये मोनालिसाचा साधेपणा पाहिला. ते तिच्या साधेपणाने प्रभावित झाले आणि त्यांनी त्यांच्या द डायरी ऑफ मणिपूर या चित्रपटात तिला काम देण्याचा निर्णय घेतला. आता एका अतिशय सामान्य कुटुंबातील मुलगी रुपेरी पडद्यावरही चमकताना दिसणार आहे. सनोजने हे चित्रपट बनवले आहेत

चित्रपट निर्माते सनोज मिश्रा यांनी आतापर्यंत बऱ्याच चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. त्यांच्या चित्रपटांमध्ये काशी ते काश्मीर, डायरी ऑफ वेस्ट बंगाल, लफंगे नवाब, गांधीगिरी, शशांक, गझनवी आणि राम की जन्मभूमी यांचा समावेश आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# झाडावर आदळून स्कूल बस पलटी, शाळेत जाण्याआधीच नववीच्या विद्यार्थिनीवर काळाचा घाला

**यवतमाळ :** यवतमाळमध्ये भीषण अपघाताची घटना घडलीये. स्कूल बसचा मोठा अपघात झाला. या अपघातात एका विद्यार्थिनीचा जागीच जीव गेला आणि ११ विद्यार्थी गंभीर जखमी आहेत. ३० विद्यार्थ्यांवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सध्या सुरू आहेत. ही घटना यवतमाळच्या उमरखेडमधील पिंपरी दिवटी गावाजवळ घडली. शाळेत जात असताना बसचा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. या अपघातानंतर हळहळ व्यक्त केली जातंय. हा अपघात उमरखेड तालुक्यातील पिंपरी दिवटी गावाजवळ सकाळी आठच्या दरम्यान झाला आहे. नववीत शिकणारी महिमा आप्पाराव सरकटे (वय १५) असे अपघातात मृत्यू झालेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. हे सर्व विद्यार्थी दहागाव येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेतात. आज सकाळी सर्व विद्यार्थी दिवटी पिंपरीवरून स्कूल बसने दहागावला शाळेत जात असताना बसचा स्टेअरिंगरॉड तुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले.बसचा स्टेअरिंगरॉड तुटल्याने ही बस थेट एका झाडावर आदळली आणि पलटली झाली.

धक्कादायक म्हणजे अपघाताची घटना घडताच बसचालक हा घटनास्थळावरून फरार झाला. अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थ मदतीसाठी धावून आले. विद्यार्थ्यांना ग्रामस्थांनी उमरखेडच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासात महिमा सरकटे या विद्यार्थीला मृत घोषित केले.अपघाताची माहिती मिळताच पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांच्याशी संपर्क साधून अपघातग्रस्तांना तातडीने सर्व प्रकारची मदत करण्याचे निर्देश दिले. अपघातासाठी दोषी असलेल्यांवर गुन्हे दाखल करून घटनेची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व शाळांच्या स्कूल बसची तपासणी करण्याचे आदेश देखील संजय राठोड यांनी दिले आहेत. या अपघातानंतर आता स्कूल बस चालकाचा शोध हा घेतला जातोय. या घटनेने सर्वांनाच मोठा धक्का बसल्याचे बघायला मिळत आहे. अपघातानंतर अधिकाऱ्यांनीही रूग्णालयात धाव घेतली.

# अरजित सिंगचा आवाज चोरल्यानं गुगल आणि ॲमेझॉनही आलेलं गोत्यात, काय घडलेलं नेमकं?



**मुंबई:** पुरस्कारांची नुकतीच घोषणा करण्यात आली. गायक अरिजीत सिंह याला पद्मश्री जाहीर झाला आहे. पद्मश्री जाहीर झाल्यानंतर अरिजीतवर अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे. गेल्या काही वर्षात अरिजीतनं भारतीय प्रेक्षकांची मनं जिंकली आहे. त्याच्या आवाजाची वेगळीच जादू भारतीय प्रेक्षकांवर झाली आहे. आता पद्मश्री पुरस्कारानं त्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. अरिजीतचा आवाज चोरणाऱ्यांना कोर्टानं दिलेला दणका तर काही महिन्यांपूर्वी आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर करुन कोणाच्याही आवाजाची नक्कल करण्याचं प्रमाण वाढलं होतं. हे अरिजीत सिंहसाठीही डोकेदुखी ठरलं होतं. जगभरातील कॉन्सर्ट आणि सिनेमांमध्ये एकापेक्षा एक गाणी देऊन चाहत्यांचे मन जिंकणाऱ्या अरिजितलादेखील एआयचा फटका बसला होता. कोणाचाही आवाज अरिजितच्या आवाजात रुपांतरित करून देणारं एआय टुल उपलब्ध होतं. सोशल मीडियावर असे अरिजीतच्या आवाजातील विविध गाणीही व्हायरल झाली होती.

# भिजवलेले बदाम आणि मनुका खाल्ल्याने मुलाचा मेंदू तीक्ष्ण होतो का? डॉक्टरांनी सांगितले सत्य



प्रत्येक गरोदर स्त्रीला तिच्या न जन्मलेल्या मुलाला सर्व चांगले गुण मिळावेत असे वाटते. यासाठी मुलाचे मन तीक्ष्ण असावे असे तिला वाटते. गरोदरपणात घरातील वडीलधारी मंडळीही बाळाला हुशार बनवण्यासाठी अनेक प्रकारच्या गोष्टी खाण्याचा सल्ला देतात. मुलाच्या मनाला तीक्ष्ण करण्यासाठी इन्स्टाग्रामवरील एका रीलमध्येही असाच दावा करण्यात आला आहे. हा दावा काय आहे आणि हे डॉक्टरांकडून जाणून घेऊयात. युजरने इंस्टाग्रामवर एक रील शेअर केली आहे. असे सांगितले जाते की जर गर्भवती महिलेने गरोदरपणात दोन गोष्टी खाल्ल्या तर मुलाचा मेंदू संगणकासारखा बनतो. रात्री झोपण्यापूर्वी दोन बदाम आणि ५-६ मनुके पाण्यात भिजवण्याचा सल्ला यूजरने दिला आहे. सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले ड्रायफ्रूट्स खाल्ले तर गर्भाचा मेंदू तीक्ष्ण होतो.

**दाव्याचे सत्य-** दाव्याचे सत्य जाणून घेण्यासाठी, आम्ही डॉ. अमृता रझदान कौल, वरिष्ठ सल्लागार, प्रसूती आणि स्त्रीरोग विभाग, एशियन हॉस्पिटल, फरीदाबाद यांच्याशी बोललो . त्यांनी सांगितले की भिजवलेले बदाम आणि बेदाणे मुलांच्या मेंदूसाठी खूप फायदेशीर आहेत. परंतु गर्भवती महिलेला ते सेवन करण्याची योग्य पद्धत माहित असावी.

**डॉक्टरांचे मत-** डॉक्टर सांगतात की ड्रायफ्रूटसमध्ये फॅटी ॲसिड असते. ही फॅटी ॲसिडस, योग्यरित्या वापरल्यास, गर्भाच्या मेंदूच्या विकासास मदत करण्यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहेत. डॉक्टरांच्या मते, आपल्या मेंदूतील न्यूरॉन्सवर फॅटी ॲसिडचा थर असतो. हे ऑक्सिडेटिव्ह तणावापासून न्यूरॉन्सचे संरक्षण करते. सुका मेवा केवळ गर्भातील न्यूरॉन्सच्या विकासात मदत करत नाही तर भविष्यातील विकृतींपासून बाळाचे संरक्षण देखील करतात.

**डॉक्टरांचा सल्ला-** गरोदर महिलांना सोललेली कोरडी फळे भिजवल्यानंतर खाण्याचा सल्ला डॉक्टर नेहमी देतात. सुका मेवा भाजण्यापेक्षा हा चांगला आणि आरोग्यदायी मार्ग आहे.

**निष्कर्ष काय होता-** सजग टीमने केलेल्या वस्तुस्थिती तपासण्यावरून असे दिसून आले की, इंस्टाग्रामवरील पोस्ट ज्यामध्ये भिजवलेले बदाम आणि बेदाणे गर्भाच्या मेंदूला तीक्ष्ण करू शकतात असे म्हटले आहे, ती पूर्णपणे खरी आहे. भिजवलेल्या ड्रायफ्रुट्स व्यतिरिक्त पुरेशी झोप, भरपूर पाणी पिणे आणि सकस आहार घेणे यांचाही मुलांच्या मानसिक विकासावर चांगला परिणाम होतो.

# मिश्र शेती ठरली फायदेशीर ! प्रयोगशील शेतकरी वर्षाला घेतोय लाखो रुपयांचे उत्पन्न

**भोपाळ :** शेती व्यवसाय करण्यास सध्याची तरुण पिढी नकार देत आहे. अस्मानी संकट, शेती मालाला योग्य बाजारभाव न मिळणे आणि भांडवलासाठी लागणारा पैसा यामुळे शेती करण्यास तरुण इच्छूक नाहीत असं म्हंटलं जातं. तर काही लोक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये विविध प्रकारचे प्रयोग करत आहेत. आणि त्यातून त्यांना लाखो रुपयांचा फायदा होत आहे. मध्य प्रदेशमधील अशाच एका प्रयोगशील शेतकऱ्याची यशोगाथा आपण जाणून घेणार आहोत. जो आधुनिक पद्धतीने शेती करत वर्षाला लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहे.

श्याम सिंह असं शेतकऱ्याचे नाव असून मध्य प्रदेशमधील भोपाळ जिल्ह्यातील गोलखेडी गावचे रहिवासी आहेत. श्याम यांच्याकडे नऊ एकर वडीलोपार्जित जमीन आहे. त्यांनी या जमिनीवर मिश्र शेती पद्धतीचा प्रयोग यशस्वी केला. आणि आज ते त्यातून वर्षाला १५ लाख रुपयांचे उत्पन्न घेत आहेत. पॉली हाऊसचा केला उपयोग श्याम सिंग यांनी मिश्र शेतीसाठी पॉली हाऊसचा उपयोग केला आहे.




कृषी विभागाची मदत घेऊन त्यांनी पॉली हाऊस तयार केले. नंतर त्यात पालेभाज्यांची लागवड केली ज्यात त्यांना प्रचंड आर्थिक फायदा झाला. श्याम यांनी नऊ एकर जमिनीपैकी दोन एकर जमिनीवर भाजीपाला, चार एकर जमिनीवर धान्य आणि दोन एकर जमिनीवर फळझाडे लावली आहेत. तर उर्वरित जमिनीवर सेंद्रिय खत तयार केले जाते. अशा या मिश्र शेतीमुळे त्यांना चांगला नफा होत आहे.

पशु पालनाचा होतोय फायदा श्याम सिंह यांचा शेती सोबतच पशु पालनाचा देखील व्यवसाय आहे. श्याम दररोज ६० ते ७० लिटर दुध विकत असतात. यामधून त्यांना महिन्याला १ लाख २६ हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. दरम्यान, श्याम सिंह यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत मिश्र शेती करण्याचा प्रयोग यशस्वी ठरवला आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील शेतकरी त्यांच्याकडे मार्गदर्शन घेण्यासाठी येतात.

# सिम कार्ड हॅक करून साडेसात कोटींवर डल्ला

## गोरेगावमधील स्टील कंपनीची फसवणूक, काय घडलं?

**मुंबई :** स्टील क्षेत्रात कार्यरत असलेल्या गोरेगाव येथील एका कंपनीच्या पदाधिकाऱ्याचे सिम कार्ड हॅक करून कंपनीच्या खात्यातील तब्बल साडेसात कोटी रुपयांवर सायबर चोरांनी डल्ला मारला आहे. बँक खात्याशी संलग्न मोबाइल क्रमांकाचे सिम कार्ड हॅक करण्यात आले. कोणाचेही फोन तसेच संदेश येत नसल्याचे लक्षात आल्यावर मोबाइल सेवा देणाऱ्या कंपनीच्या गॅलरीमध्ये जाऊन तपासले असता कंपनीच्या खात्यातून लूट करण्यात आल्याचे लक्षात आले. कंपनीला तक्रार करण्यास विलंब व्हावा, यासाठी शनिवार, रविवार सलग सुट्टी पकडून डल्ला मारण्यात आला.

गोरेगाव पश्चिमेकडील श्रीकृष्ण स्टील कंपनीच्या मालकाने दिलेल्या तक्रारीनुसार, ते ही कंपनी वडील आणि भाऊ मिळून चालवत असल्याचे म्हटले आहे. कंपनीचे आयसीआयसीआय बँकेत खाते असून, दैनंदिन आर्थिक व्यवहारासाठी याच खात्याचा वापर केला जातो. तक्रारदाराच्या भावाकडे असलेला मोबाइल क्रमांक या खात्याशी जोडण्यात आला आहे. बँक खात्यामध्ये करण्यात आलेल्या व्यवहाराचे संदेश याच मोबाइल क्रमांकावर येत असतात.

शनिवारी २१ डिसेंबरला या मोबाइल क्रमांकावर एकही संदेश किंवा फोन आला नाही. नातेवाईक आणि परिचयातील व्यक्तींनी हा क्रमांक बंद येत असल्याचे सांगितले.

बिल भरायचे राहून गेले असेल किंवा नेटवर्क नसेल असा विचार करून याबाबत गॅलरीमध्ये जाऊन




चौकशी करण्याचे ठरले. दुसऱ्या दिवशी रविवार असल्याने गॅलरी बंद होती म्हणून सोमवारी मोबाइल सेवा पुरविणाऱ्या गॅलरीमध्ये गेल्याचे तक्रारदाराने सांगितले. गॅलरीमध्ये मोबाइल क्रमांकाची सेवा सुरू असल्याचे सांगण्यात आले. काहीतरी संशयास्पद वाटल्याने या क्रमांकावर काही संदेश आलेत का? याबाबत गॅलरीमधून माहिती घेतली असता धक्कादायक माहिती समोर आली.टप्याटप्याने बँक खात्यामधून सात कोटी ४२ लाख रुपये काढण्यात आले होते. पैसे काढल्याचे संदेश पोहोचू नयेत, यासाठी सिमकार्ड हॅक केले असावे असे गॅलरीमध्ये सांगण्यात आले. सायबर फसवणूक असल्याचे लक्षात आल्यावर याबाबत उत्तर विभाग सायबर पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली. कंपनीच्या बँक खात्यातून वेगवेगळ्या खात्यांमध्ये रक्कम वळवून ती काढण्यात आल्याचे बँकेतून मिळालेल्या स्टेटमेंटवरून दिसत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# उपशिक्षणाधिकाऱ्यासह दोघांना एसीबीचा धडा

## ३५ हजारांची लाच घेताना लिपिकही अडकला

**नागपूर:** ज्युनियर कॉलेजच्या अकरावी आणि बारावी या दोन वर्गांचा दर्जा वाढविण्याचा प्रस्ताव कोणत्याही त्रुटीविना शासनाकडे सादर करण्यासाठी ३५ हजारांची लाच घेणाऱ्या प्रभारी उपशिक्षणाधिकारी व वरिष्ठ लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चांगलाच धडा शिकवला. एसीबीच्या पथकाने शनिवारी लाच घेताना दोघांना अटक केली. या कारवाईमुळे शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली आहे. खापा येथील ३३वर्षीय संस्थाचालकाने दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली प्राप्त माहितीनुसार, दर्जा वाढविण्याच्या प्रस्ताव त्रुटीविना अध्यक्ष तथा शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयात सादर करण्यासाठी बनसोड यांनी संस्थाचालकाला २० हजार रुपयांची मागणी केली. १८ जानेवारीला पहिला हप्ता म्हणून बनसोड यांनी पाच हजार रुपये घेतले. हा प्रस्ताव अध्यक्ष तथा शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे त्रुटी न काढता पाठविला. यासाठी १५ हजार रुपये



बक्षीस मागितले. संस्थाचालकाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी नेवारेंनी संस्थाचालकाला २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. संस्थाचालकाने एसीबीचे अधीक्षक डॉ. दिगंबर प्रधान यांच्याकडे तक्रार केली. प्रधान, अपर अधीक्षक संजय पुरंदरे, सचिन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक अनिल जिट्टावार, निरीक्षक प्रवीण लाकडे, सचिन मत्ते, त्यांचे सहकारी सारंग बालपांडे, अस्मिता मेश्राम, गीता चौधरी, होमेश्वर वाईकर, राजू जांभूळकर यांनी शनिवारी सिव्हिल लाइन्समधील जिल्हा परिषद परिसरात सापळा रचला. ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने दोघांना अटक केली. त्यांच्याविरुद्ध सदर पोलिस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला.

# मलकापूर शहर व तालुका काँग्रेस कमिटी तर्फे निवडणूक आयोगाचा जन्म दिवस साजरा करण्यात आला

**मलकापुर :** भारतीय निवडणूक आयोगाचे स्थापना दीनानिमित्त राष्ट्रीय मतदार दीनाचे औचित्य साधून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी च्या निर्देशानुसार , मलकापूर शहर व तालुका काँग्रेस कमिटी तर्फे निवडणूक आयोगा चा जन्म दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी मलकापुर महाविकास आघाडीचे नेते माजी आमदार माननीय राजेश जी एकडे यांनी स्थानिक विश्राम गृह येथे नुकत्याच सम्पन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत निवडणूक आयोगच्या संदेहास्पद भूमिकेविषयी प्रश्न उपस्थित केले.लोकशाही प्रधान देशात निवडणूक आयोगची भूमिका ही निपक्ष आणि पारदर्शक निवडणूक घेण्याकरिता अत्यंत महत्वाची असते परंतु दुर्देवाने हे सांगावे लागत आहे की प्रत्यक्ष निवडणूक आयोग आपली संवैधानिक जवाबदारी पार पडताना प्रथम दर्शनी सम्पूर्ण निवडणूक काळात दिसला नाही उलटपक्षी निवडणूक आयोगाच्या संपूर्ण निवडणूक काळात घेतलेल्या भूमिकेमुळे सामान्य मतदारांमध्ये निवडणूक निकालांना घेऊन शंका उपस्थित झाली आहे. २०२४ मध्येच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकी नंतर केवळ ५ महिन्यात महाराष्ट्रात ७५ लाख नवीन मतदरांची नोंदणी होणे जी की न भूतो न भविष्यति अशी वाढ आहे या बद्दल निवडणूक आयोग तर्क संगत उत्तर का देत नाही हा प्रश्न सामान्य मतदारांमध्ये उपस्थित होत आहे, विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात एकूण ९.७ कोटी मतदार असल्याचा निवडणूक आयोगाचा दावा आहे पण मोदी सरकारच्या अख्त्यारी खाली येणाऱ्या केन्द्रीय आरोग्य मंत्रलयाच्याच अहवालानुसार महाराष्ट्रात १८ वर्षे आणि त्याहुन अधिक वयाची प्रौढ लोकसंख्या केवळ ९.५४ कोटी इतकी आहे सरकारच्या स्वतःच्या अहवालानुसार महाराष्ट्रात प्रौढ लोकसंख्ये पेक्षा १६ लाख अधिक मतदरांची नोंदणी ऐन निवडणुकी च्या तोंडावर कशी झाली? या बाबत निवडणूक आयोग उत्तर का देत नाही. लोकसभे च्या निवडणुकी पेक्षा विधान सभा निवडणुकीत महायुती ला अडीच कोटी मते मिळाली होती परंतु विधानसभा निवडणुकीत महायुती ला ३ कोटी २५ लाख मते मिळाली म्हणजेच जेवढी मते राज्यात वाढली ती सम्पूर्ण मते महायुतीलाच कशी काय मिळाली हा प्रश्न सुद्धा अनुत्तरित्च आहे या अशा अनेक प्रश्नांची समर्पक व तर्कसंगत उत्तरे मतदारांना देण्याची संवैधानिक जवाबदारी निवडणुक आयोगाची आहे पण निवडणुक आयोग उत्तरे देत नाही एकूण काय तर सामान्य मतदारांची



विधानसभा निवडणुकीत फसवणूक झाल्याची प्रबळ शंका सामान्य मतदारांमध्ये सम्पूर्ण राज्यभर निर्माण झालेली आहे. एकप्रकारे निवडणूक आयोगाने राज्यातील सामान्य मतदारांची फसवणूकच केलेली आहे. जो पर्यन्त निवडणूक आयोग उपस्थित प्रश्नांची सर्व माहिती आणि उत्तरे स्वच्छपणे मतदारांसमोर आणत नाही तोपर्यंत आम्ही निवडणुकीचा निकाल मान्य करणार नाही असेही राजेशजी एकडे या प्रसंगी म्हणाले. या प्रसंगी सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते तसेच कांग्रेस नेते डॉ. अरविंद जी कोलते ,हाजी रशीद खा जमदार शहर अध्यक्ष राजू पाटिल तालुका अध्यक्ष बंडू पाटिल , अँड हरीश रावळ ,श्याम राठी नगर सेवक राजेश वाडेकर ,अनिल गांधी प्रमोद दादा अवसरमोल , सौ.मंगलाताई पाटील , विनायक पाटील गिरीश देशमुख ,दिलीप गोळीवाले, विनय काळे आणि बरेच कॉंग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते हजर होते. प्रेस कन्फरेन्स नंतर माननीय तहसीलदार साहेबांना निवेदन देण्यात आले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मी आजपर्यंत जे काम केले केले, ते केवळ...

# पद्मश्री पुरस्कार जाहीर होताच अशोक मामांची भावुक प्रतिक्रिया



**मुंबईः** प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला शनिवारी पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. लोकसभेचे माजी सभापती मनोहर जोशी, गझल गायक पंकज उधास यांना सन २०२५साठीचा मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला. याशिवाय पद्मश्री पुरस्कारांमध्ये अरण्यऋषी मारुती चितमपल्ली, ज्येष्ठ कलाकार अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव, प्रख्यात चित्रकार वासुदेव कामत, शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे-देशपांडे, स्वातंत्र्यसैनिक लिबिया लोबो सरदेसाई आदींचा समावेश आहे. ज्येष्ठ कलाकार शेखर कपूर यांना पद्मभूषण, तर गायक अरिजीत सिंह यांना पद्मश्री जाहीर झाला. पद्मविभूषण पुरस्कारांमध्ये मारुती सुझुकीच्या माध्यमातून भारतातील मध्यमवर्गीयांचे चारचाकी गाडी खरेदी करण्याचे स्वप्न साकार करणारे सुझुकी मोटारवाहन उद्योगाचे संस्थापक ओसामू सुझुकी, विख्यात साहित्यिक एम. टी. वासुदेवन नायर, प्रसिद्ध लोकगायिका शारदा सिन्हा, निवृत्त सरन्यायाधीश जगदीशसिंह खेहर, कला क्षेत्रातील कुमुदिनी लाखीया व लक्ष्मीनारायण सुब्रमण्यम, डॉ. डी. नागेश्वर रेड्डी यांचा समावेश आहे. साध्वी ऋतंबरा, बिहारचे माजी उपमुख्यमंत्री सुशीलकुमार मोदी यांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

**पद्मश्री जाहीर झाल्यानंतर अशी होती अशोक सराफ यांची प्रतिक्रिया?**

पद्मश्री पुरस्कार मिळाल्याचे ऐकून मी प्रचंड भावूक झालो आहे. हा सन्मान फक्त माझ्या कामाचा नाही, तर गेली अनेक दशके मला दिलेल्या प्रेक्षकांच्या प्रेमाचा आणि त्यांच्या निःस्वार्थ पाठिंब्याचा आहे, अशी भावपूर्ण प्रतिक्रिया ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली. मी आजपर्यंत जे काम केले केले, ते केवळ अभिनयाच्या आणि विनोदाच्या माध्यमातून लोकांचे हास्य आणि समाधान जपण्यासाठी केले. आज माझ्या कलेला मोठे मान्यतापत्र मिळाले आहे. माझे सहकारी, माझे कुटुंबीय, आणि मला प्रेरणा देणाऱ्या या क्षेत्रातील प्रत्येक कलाकाराला हा पुरस्कार मी समर्पित करतो, असे अशोक सराफ यांनी नमूद केले. हा क्षण माझ्या आयुष्यभराच्या प्रवासाची एक सुंदर आठवण आहे, ज्यामुळे मी अधिक जोमाने काम करण्यासाठी तयार आहे, अशी पुस्ती त्यांनी जोडली.

# भारतीय प्रजासत्ताक दिन चिरायू होवो...!




**मेहकरः** आज भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मेहकर येथील धर्मवीर स्व.दिलीपराव रहाटे शिक्षण बहुउद्देशिय प्रसारक संस्था येथे ध्वजारोहण केंद्रीय मंत्री नामदार मा.श्री.प्रतापरावजी जाधव साहेब यांच्या हस्ते संपन्न झाले. राष्ट्रध्वजाला वंदन करताना उपस्थितांमध्ये उत्साहाचे आणि देशभक्तीचे वातावरण होते. ध्वजारोहणानंतर संकुलातील विद्यार्थी, शिक्षक, आणि इतर कर्मचारी यांच्याशी सविस्तर संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित अडचणी, शिक्षकांना येणाऱ्या समस्या आणि संकुलाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना यावर सखोल चर्चा केली.

शिक्षण हा समाजाच्या विकासाचा मुख्य आधारस्तंभ आहे आणि भविष्यातील युवा पिढी देशाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी युवासेना सहसचिव तथा जिल्हाप्रमुख श्री.ऋषी जाधव, श्री.गणपतराव रहाटे,श्री. मधुमामा रहाटे, प्रचार्य श्री. लाहोरकर सर व संस्थेचे प्रमुख पदाधिकारी, शिक्षक वर्ग,विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

# या पिवळ्या बियांच्या खराब कोलेस्ट्रॉल होईल सर्रकन होईल कमी, हट्टी चरबी होईल गायब...!

खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या आजकाल सामान्य झाली आहे. शरीरातील खराब कोलेस्टेरॉल रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊन त्यांना ब्लॉक करते.उच्च कोलेस्टेरॉलची पातळी औषधांच्या मदतीने कमी केली जाऊ शकते. याशिवाय काही घरगुती उपायांनीही या समस्येपासून मुक्ती मिळू शकते. शरीरातील वाढलेले कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी धणे प्रभावी ठरू शकतात. त्यांचा वापर करून खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करता येते. चला तर मग जाणून घेऊया उच्च कोलेस्ट्रॉलमध्ये कोथिंबीर किती फायदेशीर आहे आणि त्याचा वापर कसा करायचा?




**वजन कमी होणे**

धण्यामध्ये शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवणारे घटक असतात. जलद चयापचय झाल्यामुळे, शरीरात साठलेली चरबी जाळणे आणि वजन कमी करणे सोपे होते. त्यामुळे ज्या लोकांना वजन कमी करायचे आहे त्यांनी दररोज कोथिंबिरीचे पाणी प्यावे.

**सांधेदुखीपासून आराम**

शरीरात जळजळ वाढल्याने संधिवात आणि इतर सांधे संबंधित समस्या वाढू शकतात. अशा परिस्थितीत सांधेदुखीसारख्या समस्या वाढू लागतात. कोथिंबीरमध्ये दाहक-विरोधी घटक आढळतात जे शरीरातील सूज कमी करतात आणि सांधेदुखीपासून आराम देतात.

**मधुमेह नियंत्रण**

धण्याचे पाणी मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर ठरू शकते. कोथिंबिरीचे पाणी प्यायल्याने शरीरातील साखरेची पातळी वाढण्यास प्रतिबंध होतो. हे मधुमेहाच्या व्यवस्थापनात उपयुक्त ठरते.कोथिंबिरीच्या बियांचे पाणी पिणे देखील शिरामध्ये जमा झालेले गलिच्छ कोलेस्ट्रॉल साफ करण्यासाठी फायदेशीर ठरू शकते. एलडीएल कमी करण्यासाठी तुम्ही नियमितपणे कोथिंबीरचे पाणी पिऊ शकता. कोथिंबीरचे पाणी प्यायल्याने रक्तातील लिपिड प्रोफाइल देखील सुधारते.

**उच्च कोलेस्ट्रॉलच्या बाबतीत धणे बियाणे कसे सेवन करावे?**

हा उपाय करण्यासाठी एक चमचा धणे घ्या हे एका ग्लास पाण्यात रात्रभर भिजत ठेवा. हे पाणी गाळून दुसऱ्या दिवशी सकाळी प्या. असे काही दिवस नियमित केल्याने कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होईल.कोथिंबीरचे सेवन उच्च कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी फायदेशीर ठरू शकते. तथापि, जर तुमची समस्या वाढत असेल तर तुम्ही डॉक्टरांशी संपर्क साधावा. जर तुम्हाला आरोग्याच्या कोणत्याही गंभीर समस्येचा सामना करावा लागत असेल तर कोथिंबीर खाण्यापूर्वी आरोग्य तज्ञाचा सल्ला जरूर घ्या. उच्च कोलेस्ट्रॉलसाठी धणे बियाणे फायदे धण्यांमध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात, जे कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करतात. याशिवाय यामध्ये व्हिटॅमिन-ए, व्हिटॅमिन-सी, फॉलिक ॲसिड आणि बीटा कॅरोटीन यांसारखे अनेक पोषक घटक असतात. याच्या वापराने शिरांमध्ये जमा झालेले कोलेस्ट्रॉल साफ होण्यास मदत होते. धण्यांचे नियमित सेवन केल्याने पचनक्रिया मजबूत होते आणि वजन नियंत्रणात राहते. याशिवाय हृदयाशी संबंधित आजारांचा धोकाही कमी होतो.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# प्रजासत्ताक दिनी प्रशासकीय इमारतीमध्ये ध्वजारोहण

जनसंचलन/बुलढाणा

येथील प्रशासकीय इमारतीमधील विविध विभागाच्यावतीने प्रजासत्ताक समारंभ आयोजित करण्यात आला होता. विभागीय अधिकारी विपुल राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उत्पादन शुल्क अधिक्षक डॉ. पराग नवलकर, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त प्रमोद पाटील, गजानन घीरके, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे, जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड आदी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

जनसंचलन/बुलढाणा

भारताच्या ७६ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्वजारोहण समारंभ साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन मानवंदना देण्यात आली. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, राजेंद्र पोळ, समाधान गायकवाड, अजिक्य गोडगे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील तसेच विविध विभागाचे विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. तसेच तंबाखु विरोधी, बालविवाह व भृण हत्या प्रतिबंधक शपथ घेण्यात आली. त्यानंतर प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या अधिकारी, कर्मचारी व खेळाडूंना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांच्या हस्ते मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा कार्यालयातील खेळाडु, छायाचित्रकार आणि हर घर सविधान



उपक्रमातील अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला.

# प्रवाशांना सौजन्याची वागणूक द्या - केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

जनसंचलन/मेहकर

एसटी महामंडळाच्या प्रगतीसाठी वक्तशीरपणा, स्वच्छता आणि प्रवाशांशी सौजन्याची वागणूक महत्त्वाची आहे. त्यामुळे महामंडळाची कार्यक्षमता आणि लाभ अधिक होईल, असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. मेहकर एसटी आगाराला दहा नवीन बसेस प्राप्त झाल्या आहेत. या गाड्यांचे लोकार्पण केंद्रीय मंत्री जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २४) करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात जाधव बोलत होते. समारंभात प्रमुख अतिथी म्हणून शिंदेसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश वाळूकर, जयचंद बाठीया, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष अरुण दळवी, विश्वास सवडतकर, सास्ते पाटील, भूषण घोडे आदी उपस्थित होते. आगाराच्या कार्यकाळात अरुण गोले यांच्या नेतृत्वाखाली आगाराने



राज्यात प्रथम क्रमांक मिळवला असल्याचा उल्लेखही केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी केला. प्रास्ताविक हर्षल साबळे यांनी केले. चालक दिनानिमित्त चालक संगीता लादे यांचा सत्कार करण्यात आला. समारंभात विनोद पहाड, भुजंगराव रहाटे, दत्ता पाटील, राजीव घनवट आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन नागेश कांगणे यांनी केले, तर आभार प्रमोद संगळे यांनी मानले. मेहकर आगाराला नवीन बसेस उपलब्ध झाल्यामुळे विविध मार्गावर बसफेऱ्या वाढणार आहेत.

# प्रधानमंत्री दिव्याशा केंद्राचं २७ जानेवारीला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार लोकार्पण...

जनसंचलन/बुलढाणा

दिव्यांग तसेच राष्ट्रीय वयोश्री योजनेतंर्गत नागरिकांना गरजेनुसार आवश्यक असलेले साहित्य मोफत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र बुलढाणा येथे सुरू करण्यात येत आहे या केंद्राचे लोकार्पण २७ जानेवारीला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार असून मुंबई ,नागपूर नंतर राज्यातील तिसरा केंद्र बुलढाणा जिल्ह्यात सुरू होत आहे . केंद्र सरकारच्यावतीने दिव्यांग बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात या योजनेअंतर्गत दिव्यांगाना आवश्यक असलेले उपकरणे ,साहीत्य मोफत सहज आणि कमी वेळेत उपलब्ध व्हावेत या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्यावतीने प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र सुरू करण्यात आली आहे . देशात आतापर्यंत ६८ केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत महाराष्ट्र राज्यामध्ये मुंबई नागपूर नंतर आता बुलढाणा शहरामध्ये प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र सुरू होत आहे .२७ जानेवारीला दुपारी १२ वाजता केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या केंद्राचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा बुलढाणा शहरातील धाड रोड स्थित असलेल्या अपंग निवासी शाळा आणि पुनर्वसन केंद्र येथे होणार आहे . या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री श्रीमती रक्षा खडसे पालकमंत्री मकरंद पाटील राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्यासह आमदार सर्वश्री वसंत खंडेलवाल , धीरज लिगांडे , किरणराव सरनाईक , डॉ संजय कुटे ,चैनसुख संचेती ,संजय गायकवाड , श्वेताताई महाले , मनोज कायंदे ,सिद्धार्थ खरात , जिल्हाधिकारी किरण पाटील , जिल्हा परिषदेचे सी ईओ गुलाबराव खरात समाज कल्याण अधिकारी डॉ अनिता राठोड उपस्थित राहणार आहेत . प्रधानमंत्री दिव्याशा केंद्राच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना अत्यावश्यक असलेले साहित्य मोफत



देण्यात येते तसेच राष्ट्रीय योजनेअंतर्गत दारिद्र रेषेखालील वयोवृद्ध नागरिकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार साहित्यही या केंद्रातून देण्यात येते प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम अर्थात ( एलिम्को ) त्यांच्या साह्याने बुलढाणा शहरात सुरू करण्यात आले आहे या केंद्रातून मिळणाऱ्या साहित्याचा लाभ गरजू दिव्यांग आणि वयोवृद्ध नागरिकांनी घ्यावा अस आवाहन बुलढाणा जिल्हा प्रशासन आणि दिव्यांग कल्याण व पुनर्वसन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# ट्रक चालकाची हत्या लोणार मधील तिघांना अटक...

जनसंचलन/ लोणार

येथील ट्रक चालकाची चेहरा व डोक्यावर वार करून खून केल्याची घटना २३ जानेवारी रोजी उघडकीस आली. आरोपींनी मृतदेह टूलकिटमध्ये लपवून सोलापूर-धुळे मार्गावर आडगावजवळ ट्रक सोडून पोबारा केला. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी दि. २४ जानेवारी रोजी मुख्य संशयितासह त्याच्या दोन साथीदारांना लोणार तालुक्यातून अटक केली आहे. विजय मुरलीधर राऊत (५२, रा. केडगाव, जि. अहिल्यानगर) असे मृत ट्रक व्यावसायिकाचे नाव आहे. त्याच्या हत्येप्रकरणी मुख्य संशयित गणेश वसंता पवार (रा. सुलतानपूर), त्याचे साथीदार गणेश गजानन कुटे (रा. सुलतानपूर) व ज्ञानेश्वर गणेश घायाळ (रा. गायखेड) या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. प्राप्त माहितीनुसार, मृतक विजय राऊत हे ट्रक चालवायचे. सहा दिवसांपूर्वी ते ट्रक घेऊन रायपूरला गेले होते. तेथून लोखंडी सळई घेऊन जालन्याकडे जात होते. त्यावेळी गणेश पवार याने त्यांना मेहकरपर्यंत सोडण्याची विनंती केली. रायपूर सोडल्यानंतर सोमवारी पहाटे ४ वाजता देवरीतील पेट्रोल पंपावर त्यांनी ट्रक मध्ये डिझेल भरले आहे भरले. समोर कारंजा येथे त्यांनी पवारसोबत नाश्ताही केला. तेथे पवारने त्यांना आराम करण्याची विनंती केली. स्वतः ट्रकची जबाबदारी घेतली. राऊत झोपल्याची संधी साधून टॉमीने चेहरा, डोक्यावर वार करून क्रूरपणे त्यांचा खून केला. त्यानंतर त्यांचा मृतदेह ट्रकच्या टूलकीटमध्ये लपवून



सोलापूर-धुळे मार्गावर सोडून पोबारा केला. तेथे आडगावजवळ ट्रक उभा होता. त्यातून उग्र वास येत असल्याचे ग्रामस्थांनी छत्रपती संभाजीनगर पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी २३ जानेवारी रोजी पहाटे ट्रकची तपासणी केली. टूलबॉक्समध्ये राऊत यांचा मृतदेह आढळून आला आहे.

# जिल्ह्याची आता परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल-पालकमंत्री ना. मकरंद पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्हा हा भक्ती-शक्तीचा सुरेख संगम आहे. जिल्ह्यातील कृषी, उद्योग, आरोग्य, शिक्षण, पर्यटन, पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रातील विकासातुन जिल्ह्याची परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे. या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीत बुलढाणा जिल्हा आता थांबणार नाही, यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी आज केले देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस कवायत मैदानात पालकमंत्री ना. पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्यासह प्रशासनातील अधिकारी, विभाग प्रमुख, स्वातंत्र सेनानी, वीरमाता, वीरपत्नी, ज्येष्ठ नागरिक, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री ना. पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात आता बुलढाणा जिल्ह्याच्याही विकासाला नक्कीच गती मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी सुरुवातीच्या पहिल्या शंभर दिवसांचा आराखडा तयार केला असून त्यानुसार राज्य सरकार काम करणार आहे. यात बुलढाण्याचे मोलाचे योगदान राहील. बुलढाणा हे विदर्भाचे प्रवेशद्वार, भक्ती-शक्तीचा सुरेख संगम, स्वराज्याचे आजोळ आणि आधुनिक संत विचारांचे माहेरघर आहे. शूर सरदार लखोजी जाधवराव यांच्या घरात स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ आई साहेबांचा जन्म सिंदखेडराजा या ऐतिहासिक गावी झाला असून हे मातृतीर्थ आपल्यासाठी प्रेरणास्त्रोत आहे. आपल्या देशाची कृषि प्रधान देश म्हणून जगभरात ओळख आहे. त्याचप्रमाणे आपला जिल्हाही कृषि प्रधान आहे. शेतकऱ्यांच्या परिश्रमामुळे गेल्या हंगामात जिल्ह्याची सोयाबीनची उत्पादकता देशाच्या सरासरीपेक्षा अधिक राहिली आहे. बदलत्या वातावरणामुळे शेतीवर होणाऱ्या विपरीत परिणामावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी पीक पद्धतीत बदल करण्याची गरज आहे. ही गरज ओळखून जिल्ह्यात या चालू वर्षात १४ हजार हेक्टर क्षेत्रात संत्रा, मोसंबी, सीताफळ, केळी, पेरू, आंबा या फळपिकांची लागवड करण्यात आली आहे. सेंद्रिय शेतीचे क्षेत्रही वाढत असून ते आता आठ हजार हेक्टरपर्यंत पोहोचले आहे. आगामी काळात भाजीपाला, तेलबिया आणि बियाणे उत्पादन केंद्र विकसित करण्यावर भर दिला जात आहे. तसेच बियाणे उत्पादनात शेतकऱ्यांनी दिलेल्या योगदानामुळे सोयाबीन बियाण्यांच्या उत्पादनात जिल्हा अव्वल राहिला आहे.

यंदाच्या आर्थिक वर्षाच्या खरीप हंगामामध्ये सुमारे सात लाख पस्तीस हजारपेक्षा जास्त तर रब्बी हंगामामध्ये सव्वा तीन लाखांपेक्षा जास्त हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यावर्षी एक लाख बारा हजार हेक्टर क्षेत्रावर निर्मित सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन आहे. सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत पंचाहत्तर हजार हेक्टरपर्यंत सिंचन क्षेत्रामध्ये वाढ झालेली आहे. गतवर्षी खरीप हंगामावर अतिवृष्टीमुळे काही तालुक्यातील पिकांवर संकट आले. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात आले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये खरीप व रब्बी हंगामातील ४९७ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. अवेळी पाऊस अतिवृष्टी पूर, आणि दुष्काळ बाधित नऊ लाख शेतकऱ्यांना आतापर्यंत ८१५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मदत व पुनर्वसन विभागामार्फत देण्यात आलेली आहे. या मदतीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी शासन पुरेपूर प्रयत्न करीत आहे. शासनाने शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण योजना व ई-नाम योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सात कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना ई-लिलाव पद्धतीने आपला शेतमाल विक्री करण्याची सुविधा उपलब्ध झाली असून आतापर्यंत सुमारे ३० हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. वर्षाअखेर जवळजवळ पस्तीस लाख क्विंटल शेतमालाची विक्री झाली आहे. यातून सुमारे १३०० कोटी रुपयांहून अधिक रकमेची उलाढाल झाली असून शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत झाली आहे, ही मोठी उपलब्धी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हमीभाव व बाजारभावासाठी नजीकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ई-नाम प्रणालीवर नोंदणी करुन जास्त भाव देणाऱ्या व्यापाऱ्याकडेच शेतमाल विक्री करावी, असे आवाहन पालकमंत्री ना. पाटील यांनी यावेळी केले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसायाचा विस्तार हा जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा घटक आहे. यावर्षी एक लाख सत्तेचाळीस हजार लिटर दूध उत्पादन झाले आहे. याबरोबरच मत्स्यबीज उत्पादन वाढविण्यावर देखील भर दिला जात आहे आणि शेतकऱ्यांची औद्योगिक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात ३ हजार २१५ शेतकरी उत्पादक संस्था तर २०२ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन झाल्या आहेत, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. जिल्ह्यात जिगांव, राहेरा, आलेवाडी हे प्रमुख सिंचन प्रकल्प होत आहेत. जिगांव प्रकल्पातून सव्वा लाख हेक्टर क्षेत्रापैकी माहे जून २०२५ पर्यंत दहा हजार हेक्टर, राहेरा लघु सिंचन प्रकल्पातून मार्च २०२५ पर्यंत ४६५ हेक्टर तर आलेवाडी लघु सिंचन प्रकल्पातून जून २०२५पर्यंत ७५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. जिगांव, राहेरा, आलेवाडी या तीनही सिंचन प्रकल्पाचा तीनशे गावांना लाभ होणार आहे. जिल्ह्यात एकूण ३५ हजार ३११ कोटी रुपयांचे सिंचन प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. या सिंचन प्रकल्पातून एक लाख बारा हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.



जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाचा मानला जाणारा १३९ दशलक्ष घनमीटर साठवण क्षमतेचा वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प ८८ हजार ५७५ कोटी रुपये खर्चाचा असून, यामध्ये ३८६ मीटर लांबीच्या कालव्याचे बांधकाम प्रस्तावित आहे. यात नळगंगा, कोलोरी आणि शेलोडी हे तीन प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. या प्रकल्पामुळे बुलढाण्यातील सुमारे ३८ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. हा प्रकल्प जिल्ह्याच्या जलसंधारण आणि कृषी विकासात मोठी भूमिका बजावेल, अशी अपेक्षा पालकमंत्री यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील जिगाव, वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प, सिंदखेडराजा विकास आराखडा, ऐतिहासिक लोणार सरोवर विकास आराखड्यातील कामे, जिल्ह्यातील रस्ते विकास इत्यादी प्रकल्पांना पुढील काळात गती देऊन पूर्ण करण्याचा माझा मानस आहे. याशिवाय शिक्षण, आरोग्य, कृषी क्षेत्रात भरीव कामगिरी करण्यासाठी मोठा वाव असून या क्षेत्रांचा विकास करण्यात कोणत्याही प्रकारचा हात आखडता न घेता प्राधान्य देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत एक लाख पासष्ठ हजार शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत जिल्ह्यात दोन हजार एकरात ९१ उपकेंद्राद्वारे ४०१ मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट आहे. यापैकी पळशी आणि बोरी येथे दोन सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून उर्वरित ६७ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. या प्रकल्पांतून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठ्याची सुविधा उपलब्ध केली जात आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री अन्न प्रक्रिया आणि मुद्रा योजना या सारख्या योजनांद्वारे जिल्ह्यात नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी अल्प दराने कर्ज सवलत देवून त्यांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे. जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राच्या विस्ताराच्या दृष्टीने मोताळा येथे नविन एमआयडीसी प्रस्तावित करण्यात आली असून खामगांव आणि देऊळगांव राजा येथील औद्योगिक क्षेत्राचे विस्तारीकरण प्रस्तावित आहे. याद्वारे स्थानिक युवकांना नोकऱ्या व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न राहणार आहे.

# २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत महाआरोग्य शस्त्रक्रिया शिबिर...

**जनसंचलन/बुलढाणा**

जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मदाय रुग्णालयातर्फे २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी यादरम्यान विनामूल्य महाआरोग्य शस्त्रक्रिया व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात रुग्णांना तपासणीपासून शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या सर्व सेवा मोफत पुरवल्या जाणार आहेत. शिबिरात ओपीडीत आलेल्या रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, बीपी, २डी इको, ईसीजी यासारख्या तपासण्या मोफत करण्यात येतील, तर इतर तपासण्या सवलतीच्या दरात उपलब्ध असतील. तपासणीनंतर रुग्णालयात दाखल रुग्णांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. शिबिरात जनरल सर्जरी, मूत्ररोग, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, कान, नाक, घसा विकार, कर्करोग, मेंदू व मणका शस्त्रक्रिया, बालरोग आणि स्त्रीरोग यासह विविध आजारांवर मोफत उपचार केले जातील. रुग्णांनी नावनोंदणीसाठी जुने रिपोर्ट्स, आधार कार्ड आणि रेशन कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी स्वराली (९८२२१४९६५९) आणि प्रणाली (९८३४५४९४८७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. उल्हास पाटील रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने केले आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958